महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नाशिक विभागीय मंडळ, नाशिक
गट/सर्व्हे नं.१५६०/१ आडगांव शिवार,
न्यु इंग्लिश स्कुल जवळ, मुंबई आग्रारोड,
नाशिक – ४२२००३

Maharashtra State
Secondary & Higher Secondary Education,
Nashik Divisional Board, Nashik
Gat/Sr.No.1560/1 Adgaon shivar,
New English School, Mumbai-Agra Road,
Nashik - 422003

कार्यालय दुरध्वनी:0253 –2945241, 2945251
Website-sscboardnashik.com Email-nsksec@rediffmail.com

क्र.नाविमं/उ.मा./अ–३/३९८९
नाशिक ४२२००३
दिनांक: ०४/०२/२०२५

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त शाळा व कनिष्ठ महाविद्यालये,
नाशिक/धुळे/जळगांव/नंदुरबार,

विषय: माध्यमिक शालांत (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा फेब्रु.–मार्च २०२५ चे परीक्षेसाठी शिक्षासुची वाचनाबाबत....
संदर्भ: राज्यमंडळाचे पत्र क्र.रा.म./परीक्षा–८/३८६ दिनांक २८/०१/२०२५ रोजीचे पत्र.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये सुचित करण्यात येते की, माध्यमिक शालांत (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेचे आयोजन फेब्रु.–मार्च २०२५ मध्ये करण्यात आलेले आहे. बदलत्या सामाजिक परीस्थितीमुळै आणि परीक्षेशी संबंधित घटकांच्या वैचारिक मनोवृत्तीमुळे परिक्षेत विविध मार्गांनी निष्पन्न होणाऱ्या गैरप्रकाराचा मंडळाला सातत्याने सामना करावा लागतो. त्यादृष्टीने राज्यातील नऊ विभागीय मंडळे आपआपल्या स्तरावर विविध उपाययोजना आणि उपक्रम राबवित असतात. याच धर्तीवर विद्यार्थ्यांने कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार करू नये यासाठी गैरप्रकारामुळे विद्यार्थ्यास मंडळाच्या शिक्षासुचीनुसार होणारी कारवाई अवगत करणे आवश्यक आहे.

यासाठी विद्यार्थ्यासाठी असणारी शिक्षासुची तसेच उत्तरपत्रिकेच्या मुखपृष्ठावर मागील बाजुस असणाऱ्या सुचना (सदर शिक्षासुची व सुचना राज्यमंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत) यांचे सामुहिक वाचन सर्व कनिष्ठ महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांच्या समोर परीक्षेपुर्वी / प्रात्यक्षिक परीक्षा कालावधीत करणे आवश्यक आहे. शक्य असल्यास प्रत्येक विद्यार्थ्यास त्याची प्रत देण्यात यावी. विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घेवून सदरचा दस्तऐवज आपल्या दफ्तरी ठेवण्यात यावा. याबाबत कार्यवाही केल्याबाबतचे प्रमाणपत्र सर्व कनिष्ठ महाविद्यालयांनी न चुकता विभागीय मंडळाच्या ई–मेलवर (**nsksec@rediffmail.com**) पाठविण्यात यावे.

(एम.एस.देसले)
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्य.व उच्च माध्य. शिक्षण मंडळ,
नाशिक विभागीय मंडळ,नाशिक.

प्रत माहितीस्तव–
राज्यमंडळ, पुणे ०४.